**औषधनिर्मात्याचे ज्ञान श्रेष्ठ तसेच पद आणि जबाबदारी हि समाजाच्या हिताची: महेश झगडे**

मेट्स भुजबळ नॉलेज सिटी इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांसमोर माजी आयएस अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव श्री. महेश झगडे यांनी औषधनिर्माण शाखेतील विद्यार्थ्यांची जबाबदारी, कर्तव्य आणि त्यासंबंधीचे नियम याविषयावर व्याख्यान सदर केले. औषधनिर्मात्याला औषधाविषयीचे सर्व ज्ञान प्राप्त असून औषधांच्या गैरवापर टाळून योग्य वापराची जागृती करणे हि औषधनिर्मात्याची मुख्य जबाबदारी आहे याची जाणीव निर्माण करून ऑनलाइन फार्मसी असेल किंवा औषधनिर्माण क्षेत्रातील इतर आव्हानांचा तंत्रशुद्ध आढावा घेताना श्री. महेश झगडे यांनी विद्यार्थांच्या शंकांचे समाधान करून त्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाच्या सुरवातीला इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीरिंगचे प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी श्री झगडे यांचे स्वागत केले, या प्रसंगी इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजिचे प्राचार्य डॉ. राजेंद्र तसेच इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ. निलेश बेरड उपस्थित होते.

सदर व्याखानाचे आयोजन महाविद्यालयाचे विश्वस्थ तसेच प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले सुत्रसंचलन महाविद्यालयातील विद्यार्थी प्रणय बागुल आणि अमृता हेगडे यांनी केले व आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉ. पवन उदावंत यांनी केले. सदर कार्यक्रमास मोठ्यासंख्येने विद्यार्थी, विभाग प्रमुख आणि शिक्षक उपस्थित होते.



Hon. Mahesh Zagade Addressing the students of the institute

**Summary**

Retired IAS and Chief Secretary of Maharashtra Government Hon. Mahesh Zagade interacted with the students on the topic Responsibilities of a Pharmacist from Regulatory Aspects. He discussed various responsibilities, duties and challenges in front of Pharmacy professionals of the country. He also guided about the legal aspects of the profession and created awareness about the benefits and threats of online Pharmacy.

This lecture was organized by SWC under the guidance of Principal Hon. Dr. Sanjay Kshirsagar and coordinated by Dr. Pavan Udavant along with SWC Volunteers.